सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षापासून +२ स्तरावरील द्विलक्षी अभ्यासक्रमाच्या नवीन/ अधिकच्या तुकडयांना कायमस्वरूपी विनाअनुदान तत्वावर सुरू करण्यास मान्यता देणेबाबत.(संत ज्ञानेश्वर बहुउद्देशिय सेवाभावी संस्था व्दारा संचलित श्री साकेश्वर सायन्स ज्युनिअर कॉलेज, साकत, ता. जामखेड, जि. अहमदनगर)

महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

शासन निर्णय क्रमांकः : व्हीओसी-२०१७/प्र.क्र. १४०/व्यशि-४,

मंत्रालय विस्तार (खोली क्र.४३५), ४ था मजला
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
तारीख : १६ ऑक्टोबर, २०१७

संदर्भ :

१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : व्हिओसी-२०११/११४७/प्र. क्र. ५/व्यशि-४, दिनांक १३/१/२०११

२) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक : ८/व्हीओसी/२२०३/२०१६-१७/७५, दिनांक २२/८/२०१७

३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक : ८/व्हीओसी/२२०३/२०१७-१८/२०६, दिनांक १४/९/२०१७

प्रस्तावना :

डॉ. कोठारी आयोगाच्या १९६४ च्या शिफारशीनुसार अधिकाधिक युवकांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने १९७८-७९ पासून राज्यात व्यवसाय विषयांची ३०% व्याप्ती असलेले, +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यांत आले. सद्य:स्थितीत तांत्रिक/ वाणिज्य/ कृषी/ मत्स्य या गटातील एकूण १६ द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम राबवित येतात. सदर अभ्यासक्रम घेणा-या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शाखेमध्ये प्रवेशाच्या चांगल्या संधी उपलब्ध आहेत. त्याच बरोबर अभियांत्रिकी विद्याशाखेमधील पदविकेच्या (Diploma) व्दितीय वर्षामध्ये प्रवेशाची सुविधा उपलब्ध असल्यामुळे या अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद आहे. सदर व्यवसाय अभ्यासक्रमांची वाढती मागणी लक्षात घेता शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ पासून +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या अधिकच्या/ नविन तुकडया कायमस्वरूपी विना अनुदानित तत्वावर सुरू करण्याकरीता इच्छूक संस्थाकडून प्राप्त झालेल्या अर्ज/प्रस्तावांची संचालनालयस्तरावर छाननी करण्यांत आली त्यानुसार व्यवसाय अभ्यासक्रमातील विहित निकष/मानकांची पूर्तता करणाऱ्या संत ज्ञानेश्वर बहुउद्देशिय सेवाभावी संस्था व्दारा संचलित श्री साकेश्वर सायन्स ज्युनिअर कॉलेज, साकत, ता. जामखेड, जि. अहमदनगर या संस्थेत क्रॉप सायन्स हा विषय एका तुकडीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सुरु करण्यासाठी मान्यता देण्याची शिफारस संचालक, (व्यशि व प्रशि) यांनी संदर्भ क्र. १ येथील केली होती.तथापि सदर प्रस्तावास शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे संचालक (व्यशि व प्रशि) यांनी वरील संदर्भ क्र. ३

येथीन पत्रान्वये सदर संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून मान्यता देण्याची शिफारस केली आहे. त्याअनुषंगाने सदर संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय: -

शासन आता याव्दारे संत ज्ञानेश्वर बहुउद्देशिय सेवाभावी संस्था व्दारा संचलित श्री साकेश्वर सायन्स ज्युनिअर कॉलेज, साकत, ता. जामखेड, जि. अहमदनगर या संस्थेत क्रॉप सायन्स हा विषय एका तुकडीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून शिकविण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देत आहे.

अटी व शर्ती.

१. सबंधित संस्थेस माध्यमिक शाळा संहिता १९८१ मध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

२. मान्य अभ्यासक्रमांच्या नविन/अधिकच्या तुकडया सुरू करण्यास कायमस्वरूपी विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिली असली तरीही, भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान अथवा आर्थिक मदत देण्यांत येणार नाही.

३. मान्य अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांना शासन / संचालनालय / संचालनालयाच्या अखत्यारीतील संबंधित कार्यालये यांच्या कडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

४. शासनाने वेळोवेळी निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेस बंधनकारक राहील.

५. **"कायमस्वरूपी विनाअनुदान तत्वावर मान्यता मिळालेले +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम"** असा सूचना फलक संस्थांनी दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील. सूचना फलकावर अभ्यासक्रमांच्या मंजूर तुकडयांची संख्या व मंजूर प्रवेश क्षमता याचा उल्लेख करण्यात यावा.

६. मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर, संबंधित संस्थेने मंजूर अभ्यासक्रमासाठी मानकानुसार आवश्यक असलेल्या सर्व पायाभूत सुविधा एक महिन्याच्या कालावधीमध्ये उपलब्ध करणे बंधनकारक राहील.

७. सदर अभ्यासक्रमांना कायमस्वरूपी विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यांत आल्यामुळे या अभ्यासक्रमाकरीता संस्थेने नियुक्त केलेल्या सर्व कर्मचारी वर्गाची सेवा / वेतन व तदनुषंगिक बाबींची जबाबदारी सर्वस्वी संबंधित संस्थेची राहील. याबाबत शासन कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

८. मंजूर अभ्यासक्रमांकरीता आवश्यक कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या, त्यांची किमान शैक्षणिक अर्हता, अनुभव याबाबत संस्थेने महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१

मधील तरतुदींनुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

९. भविष्यात सदरचे अभ्यासक्रम बंद करण्याबाबत, किंवा त्यात काही बदल करण्याबाबत शासनाने निर्णय घेतल्यास तो विनाअट, विनाविलंब संस्थेने अंमलात आणणे आवश्यक राहील.

१०. अभ्यासक्रमांच्या मंजूर तुकडयांमधील प्रवेशाकरीता, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले सामाजिक/ समांतर आरक्षण व इतर नियमांचे संस्थेने काटेकोरपणे पालन करावे व गुणानुक्रमे प्रवेश देण्यांत यावेत.

११. अभ्यासक्रमांना मंजूरी मिळाल्यानंतर सदर अभ्यासक्रम संस्थेत सुरू केल्याबाबतची माहिती संस्थेने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळास तात्काळ द्यावी त्याबाबतची अनुषंगिक कार्यवाही करावी.

१२. मान्यता देण्यांत आलेल्या अभ्यासक्रमाच्या अधिकच्या/नविन तुकडयांची प्रवेश क्षमता प्रती तुकडी ५० असून, शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये मंजूर प्रवेश क्षमतेच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश झाल्यास अशा तुकडया सुरू ठेवण्याकरीता संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिका-यांची परवानगी घेणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे सलग तीन शैक्षणिक वर्षांमध्ये मंजूर प्रवेश क्षमतेच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश झाल्यास सदर अभ्यासक्रमाची तुकडी बंद करण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

१३. संबंधित संस्थेने त्यांच्याकडे भाषा/जीवशास्त्र इत्यादी विषयांचे शिक्षक आता मंजूर केलेल्या व्दिलक्षी अभ्यासक्रमाच्या तुकडीमुळे अतिरीक्त ठरणार नाहीत याची खातरजमा करुनच विद्यार्थ्यांना प्रवेश दयावा.

१४. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी उपरोक्त अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे किंवा नवीन अटी व शर्ती अंतर्भूत करण्याचे अधिकार शासनाचे राहतील.

१५. **+२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकडयांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी संचालक (व्यवसाय शिक्षण) यांचेकडून स्थानिक स्तरावर समिती नेमुन समितीच्या सर्वकष निरीक्षणानुसार प्राप्त अहवालाप्रमाणे संचालनालयाच्या परवानगीने प्रवेश देण्यात यावेत. तद्नंतर सर्व संबंधित संस्थाकडून शासनाने विहित केलेल्या सर्व निकष व अटी/शर्तींची पुर्तता होत असल्याबाबत संचालक (व्यवसाय शिक्षण) यांच्याकडून सातत्याने आढावा घेण्यात यावा.**

१६. व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत मंजूर व्यवसाय अभ्यासक्रमाच्या मंजूर तुकडीनुसार प्रवेश क्षमतेपेक्षा अतिरिक्त अनधिकृत प्रवेश केल्यास शासनाने सन २०१३ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० राजपत्र दि. २१/८/२०१३ अन्वये प्रसिध्द झालेल्या अधिनियमान्वये अनधिकृत संस्था स्थापन करण्यास अथवा अनधिकृत पाठ्यक्रम सुरू करण्यास मनाई करण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये मान्यता दिलेल्या सदर संस्थेने व्यवसाय अभ्यासक्रम सुरु केलेले, अभ्यासक्रम निहाय प्रवेशित विद्यार्थी संख्या याबाबतची माहिती संचालक, व्यवसाय शिक्षण यांनी शासनास दिनांक २०/३/२०१८ पर्यंत सादर करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक क्र. **२०१७१०१६१७००५५४७०३** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sakharam Dina Kharat

Digitally signed by Sakharam Dina Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SD And E Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c6d1f4d2e41b8e84bb98ddddcac3054927f82f9c1a5810e2874cdac2c44c28c2, cn=Sakharam Dina Kharat
Date: 2017.10.16 18:06:05 +05'30'

(स. दि. खरात)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, (शालेय शिक्षण विभाग), मुंबई (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया मार्फत)
३) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक
४) संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया मार्फत.)
५) संत ज्ञानेश्वर बहुउद्देशिय सेवाभावी संस्था व्दारा संचलित श्री साकेश्वर सायन्स ज्युनिअर कॉलेज, साकत, ता. जामखेड, जि. अहमदनगर
६) मा. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्याजकता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
७) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे स्वीय सहायक.
८) मा. मंत्री (कौ.वि.व उ.) यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी सादर.
९) मा. राज्यमंत्री (कौ.वि.व उ.) यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी सादर.
१०) उप सचिव (व्यशि), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, यांचे स्वीय सहायक
११) निवड नस्ती (व्यशि-४)